# सांस्कृतिक विभाग अहवाल 2018–19

1) कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या "पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत प्राथमिक फेरीत महाविद्यालयाच्या 'मर्सिया या एकांकिकेस द्वितीय क्रमांक मिळाला. तसेच सदर एकांकिका अंतिम स्पर्धेत दाखल झाली. अंतिम फेरीत तृतीय क्रमांक पुणे येथे मिळाला.

2) अखिल भारतीय मराठी नाटयपरिषदेच्या सांगली शाखेतर्फे आयोजित पी. एन. जी. महाकरंडक एकांकिका आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय स्पर्धेत 'मर्सिया' या एकांकिकेमध्ये कु. अश्विनी राजेश जाधव हिला अभिनेत्रीसाठीचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

3) दिनांक 29 ऑक्टोबर 2018 रोजी श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत आयोजित युवा महोत्सवात महाविद्यालयाच्या 'मर्सीया' या एकांकिकेने प्रथम क्रमांक मिळविला. तसेच विलिंग्डन कॉलेज, सांगली येथे होणाऱ्या मध्यवर्ती महोत्सवासाठी त्यांची निवड झाली.

4) दि. 31 ऑक्टोबर व 1, 2 नोंव्हेबर 2018 रोजी विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत आयोजित मध्यवर्ती महोत्सवात महाविद्यालयाच्या कु. सायली नंदकुमार कुलकर्णी हिने शास्त्रीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आणि कु. वैष्णवी उमेश शेटे या विद्यार्थिनीला एकांकिका स्पर्धेत सर्वोत्कृष्ठ स्त्री अभिनेत्रीचा प्रथम पुरस्कार मिळाला.

5) 16 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालयामध्ये "साडी डे" चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनीनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला विद्यार्थिनीच्या मधून "राजमती क्वीन" ची निवड करण्यात आली.

6) दि. 5 सप्टेंबर 2018 रोजी महाविद्यालयामध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या कडून महाविद्यालयाचे दैनदिन कामकाज पार पाडण्यात आले.

7) दि. 12 ऑक्टोबर 2018 रोजी महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागातर्फे "रास दांडिया व महादगा" चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थिनीकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला.